| MHYA070005232013 | | | |
|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | : | २८/०३/२०१३ |
| | नोंदणी क्रमांक | : | २८/०३/२०१३ |
| | निकाल दिनांक | : | २३/०७/२०२६ |
| | कालावधी | : | व. म. दि. |
| | | | १३ ०३ २३ |

**दारव्हा येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी श्री. निलेश ल. पाटील )**
**न्यायनिर्णय घोषीत दिनांक – २७/०७/२०२६**
**(नियमित फौजदारी खटला क्रं. ७२/२०१३)**

**गुन्हा नोंद क्रं. २९/२०१३ पोलीस स्टेशन लाडखेड. निशाणी क्र.२३**

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी/तक्रारदार** | | **महाराष्ट्र शासन**<br>मार्फत पोलीस निरीक्षक,<br>**लाडखेड** पोलीस स्टेशन, लाडखेड. |
| **अभियोग पक्षातर्फे** | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. सी. बी. ऊके |
| **आरोपी** | | **पुर्ती राम पवार**<br>**वय वर्ष** – ३५, **व्यवसाय** – मजुरी<br>**रा–तिवसा, ता.जि. यवतमाळ** |
| **आरोपीतर्फे विधीज्ञ** | | **श्री. पी. जी. पांडे** |

**भाग – ब**

**(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण ५ मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये )**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | २०/१२/२०१३ |
| फिर्याद दाखल दिनांक | :– | २०/१२/२०१३ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :– | २५/०३/२०१३ |

| | | |
|---|---|---|
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :- | ०३/०१/२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :- | निरंक |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :- | निरंक |
| न्यायनिर्णय दिनांक | :- | २३/०७/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :- | आरोपीला निर्दोषमुक्त करण्यात येते. |

**आरोपींची माहिती**

| आरोपी | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याची दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम अन्वये समायोजित करणयाबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **पुर्ती राम पवार** | दिनांक २७/०२/२०१३ | दिनांक २७/०२/२०१३ रोजी जामिनावर सोडले | भारतीय दंड विधान कलम २९४, ३२४ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरक |

**भाग – क**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण ६ मधील परिच्छेद ....अन्वये )

सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयील साक्षीदार

अ. अभियोग पक्ष

| **सा.क्रं.** | **साक्षीदाराचे नांव** | **स्वरुप** | **निशाणी** |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| १ | निरंक | निरंक | .. |

<u>**न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**</u>

| अ.क्र. | नि.क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १ | १४ | दोषारोप |
| २ | १५ | आरोपीचे निवेदन |

## न्यायनिर्णय

(दिनांक २७/०७/२०२६ रोजी घोषीत केले )

अभियोग पक्षाने आरोपी विरुद्ध भारतीय दंड विधान कलम २९४, ३२४ अन्वये खटला दाखल केला आहे.

२. **<u>अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात पुढील प्रमाणे</u>** –

प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादीचे थोडक्यात म्हणणे असे आहे की, दिनांक २०/१२/२०१३ रोजी सकाळी १०.०० वाजेच्या सुमारास मौजे तिवसा येथे आरोपीने फिर्यादीच्या पत्नीस "*तु मला स्वप्नात येतेस असे म्हटले* " व असे म्हणुन शिवीगाळ केली त्यादरम्यान फिर्यादी आरोपीस समजावुन सांगत होता तेव्हा आरोपीनेच फिर्यादीस काठीने मारुन जखमी केले. त्यामुळे फिर्यादीने झालेल्या प्रकाराबाबत लाडखेड पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली.

३. सदर फिर्यादीवरुन आरोपी विरुध्द पोलीस ठाणे दारव्हा येथे गु.र.नं. २९/१२ भारतीय दंड विधान कलम २९४, ३२४ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला. तपासी अंमलदार श्री. साहेबराव ग. पाटील यांनी केलेल्या तपासाअंती आरोपीविरुध्द पुरेसा पुरावा मिळुन आल्याने त्याचे विरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

४. दिनांक ०३/०१/२०२६ रोजी आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान कलम २९४, ३२४ अन्वये निशाणी क्र.१४ कडे दोषारोप नोंदविण्यात आला. सदर दोषारोप आरोपीस त्याच्या मातृभाषेत समजावून सांगण्यात आला असता त्यांनी गुन्हा मान्य नसल्याचे नमूद करुन संपरिक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शवली.

५. अभियोग पक्षाचा पुरावा झाल्यानंत्तर आरोपीविरुद्ध सबळ पुरावा मिळुन आला नसल्याने त्याची फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ अन्वये जबानी नोंदविणेत आली नाही.

६. अभियोग पक्षातर्फे सरकरी वकील व आरोपीचे विधिज्ञ श्री. पी. जी. पांडे यांचा युक्तिवाद ऐकला.

७. एकंदर संचिकेतील कागदपत्रे व पुरावे बघता माझे निष्कषार्थ खालील मुद्दा निघतो. त्याचे उत्तर मी कारणमिमांसेसह खालील प्रमाणे दिली आहे.

| **अ.क्रं.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | अभियोग पक्षाने सिद्ध केले काय की, दिनांक २०/१२/२०१३ रोजी सकाळी १०.०० वाजेच्या सुमारास मौजे तिवसा येथे आरोपीने फिर्यादीच्या पत्नीस "*तू मला स्वप्नात येतेस असे म्हटले* " असे म्हणुन शिवीगाळ केली व त्याद्वारे भारतीय दंड विधान कलम २९४ अन्वये गुन्हा केला? | नकारार्थी |
| २ | अभियोग पक्षाने सिद्ध केले काय की, वर नमुद तारखेस, वेळी व ठीकाणी आरोपीने फिर्यादीस काठीने मारुन जखमी केले. व त्याद्वारे भारतीय दंड विधान कलम ३२४ अन्वये गुन्हा केला | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| ३ | आदेश काय ? | आरोपीला निर्दोष सोडण्यात येते. |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र. १ व २ करिता

८. अभियोग पक्षास आरोपी विरुद्ध गुन्हा सिध्दतेकरीता वारंवार संधी दिली तसेच न्यायालयातर्फे फिर्यादी व इतर साक्षीदारांना समन्स, जमानती वॉरंट, अजमानती वॉरंट काढुन सुध्दा अभियोग पक्ष हे त्यांच्या वतीने कुठल्याही साक्षीदारांना हजर ठेऊ शकले नाही. प्रस्तुत प्रकरण हे १३ वर्ष जुणे असल्यामुळे निशाणी क्र. १ वर आदेश पारीत करुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. अशा परिस्थीतीत आरोपीविरुध्द अभिलेखावर कुठलाही सबळ पुरावा आलेला नाही.

९. एकंदरीत अभियोग पक्षास साक्षीदार हजर करणेकामी अपयश आले. फिर्यादीने त्याच्या फिर्यादीमध्ये कथन केल्याप्रमाणे दिनांक २०/१२/२०१३ रोजी दुपारी १०.०० वाजेच्या सुमारास मौजे तिवसा येथे फिर्यादीच्या पत्नीस तिचे वडील शंकर यांच्या घराच्या समोरील रोडवर आरोपीने "*तू मला स्वप्नात येतेस असे म्हटले*" अशा आशयाची शिवीगाळ सुध्दा अभियोग पक्षाने संशयापलीकडे जाऊन सिध्द केलेली नाही. तसेच त्यावेळी आरोपी यानेच फिर्यादीला काठीने मारुन जखमी केली. ही बाब सुध्दा अभियोग पक्ष सिध्द करु शकले नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ व २ चे उत्तर नकारार्थी नोंदवीत आहे.

### मुद्दा क्र. ३ करीता

१०. मुद्दा क्र. १ व २ चे उत्तर नकारार्थी नोंदविले असल्यामुळे आरोपीची निर्दोष मुक्तता करणे न्यायायोग्य होईल. मी, खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. आरोपी **पुर्ती राम पवार** याची फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८ (१) नुसार भारतीय दंड विधान कलम २९४, ३२४ अंतर्गत असलेल्या गुन्हयातुन **निर्दोष मुक्तता** करण्यात येते.

२. आरोपीने दिलेले जामीनबंधपत्र व जामीनदारांचे बंधपत्र रद्द करण्यात येत आहेत.

३. याकामी जप्त मुद्देमाल एक बांबुची काठी २ फुट ९ इंच हा मुल्यहीन असल्यामुळे अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात यावा.

४. आरोपीने कलम ४३७–अ अन्वये फौजदारी प्रक्रिया संहितेच्या अंतर्गत सहा महिन्याच्या कालावधीकरीता रक्कम रुपये १५,०००/– चा जातमुचलक्याचे बंधपत्र द्यावे व सदर सहा महीनाचा कालावधी संपल्यानंतर त्यांचे बंधपत्र रद्द होवून आरोपीस पुर्णतः मुक्त करण्यात येत आहे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर केला)

Digitally signed by NILESH LAXMANRAO PATIL
Date: 2026.07.23 17:23:16 +0530

दिनांक – २३/०७/२०२६ **(निलेश ल. पाटील)**

ठिकाण – दारव्हा, जि. यवतमाळ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, (न्यायालय. क्र.२), दारव्हा

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| **Name of Stenographer** | : | Ku Divya R. Gaikwad<br>Stenographer (Grade 3) |
| **Court Name** | : | $2^{nd}$ Jt. CJJD & JMFC Darwha |
| **Date** | : | 23/07/2026 |
| **Judgment signed by presiding officer on** | : | 23/07/2026 |
| **Judgment uploaded on** | : | 23/07/2026 |